**राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांची चीन कम्युनिस्ट पार्टीच्या केंद्रीय समितीचे पॉलिट ब्यूरो सदस्य आणि चीनच्या परराष्ट्र मंत्र्यासोबत वार्तालाप (23 जून 2025)**

23 जून 2025

23 जून 2025 रोजी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. अजित डोवाल यांची महामहिम श्री. वाँग यी (पॉलिट ब्यूरो, केंद्रीय समिती, चीन कम्युनिस्ट पार्टी (CPC) आणि परराष्ट्र मंत्री, चीन) यांच्या समवेत भेट पार पडली. SCO सुरक्षा परिषद सचिवांच्या 20 व्या बैठकीच्या अनुषंगाने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल यांचा चीन दौरा होता.

2. बैठकीदरम्यान,उभय बाजूंनी अलीकडील भारत-चीन द्विपक्षीय संबंधांच्या अनुषंगाने प्रगतीचा आढावा घेतला. नागरिक परस्पर संबंधांना गती देऊन सर्वंकष भारत-चीन द्विपक्षीय संबंधांना चालना देण्याची बाब अधोरेखित करण्यात आली. प्रदेशात शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी दहशतवादाच्या सर्व प्रकारांचा आणि अभिव्यक्तीचा प्रतिरोध करण्याची गरज राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनी व्यक्त केली.

3. परस्पर हिताच्या इतर द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांवरही विचारांची देवाणघेवाण झाली.

4. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनी परस्पर सोयीस्कर तारखेला विशेष प्रतिनिधी चर्चेच्या 24 व्या फेरी साठी श्री. वाँग यी यांच्या समवेत भारतात भेटीसाठी उत्सुक असल्याचे म्हटले आहे.

नवी दिल्ली

23 जून 2025